e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study
Published By: SK Publisher
(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"
Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# नाटक, नाटककार आणि संहिता लेखन

**प्रा. डॉ. श्रीकृष्ण गो. काकडे**[१]
मार्गदर्शक, मराठी विभाग,
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय,
अकोला

**निलेश उद्धवराव पाकदुने**[२]
संशोधक विद्यार्थी
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय,
अकोला

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.50

संहिता या शब्दाला स्क्रिप्ट असा पर्याय शब्द वापरला जातो. साधारणपणे कोणतीही लिखित गद्य व पद्य म्हणजे संहिता असे आपण म्हणतो. चित्रपट, नाटक, संगीत-नाटक, चित्र नाट्य, लोकनाट्य, या आणि अशा कितीतरी प्रकारांमधधे संहिता गरजेची असते.संहिते शिवाय कुठलीही कलाकृती म्हणजे समुद्रातील वादळात नावाड्याशिवाय असलेली नाव होय. जहाजाला योग्य दिशा देण्यासाठी जशी कसलेल्या नावाड्याची गरज असते अगदी त्याचप्रमाणे नाटकाची असो वा चित्रपटाची संहिता हीच प्रेक्षकरुपी समुद्रातून पैलतीर गाठण्यासाठी नावाड्याची प्रमुख भूमिका बजावत असते. मराठी विश्वकोशात संहिता या शब्दाचा अर्थ 'एकत्र ठेवणे ' असा दिला आहे. व्याकरणाच्या परंपरेत हा शब्द संज्ञा म्हणजेच सांकेतीक अर्थाने वापरतात.संहिता या शब्दाला मंत्रातील पदे , पद पाठ ,संहिता पाठ , असे देखील पर्यायी शब्द वापरले जातात. थोडक्यात , संहिता म्हणजे पद किंवा पदांची विकृती होय .जे जे लिखित साहित्य आहे मग ते गद्य असो वा पद्य संहिता या प्रकारात मोडते. जोपर्यंत लिहिलेल्या संहितेचे रंगमंचावर वा पडद्यावर सादरीकरण होत नाही तोपर्यंतच लिखित संहितेला साहित्याचा दर्जा प्राप्त असतो. संहितेवर अनेक संस्कार करून नंतरच त्यातून त्या त्या कलाकृती जन्माला येतात. नाटकाच्या बाबतीत विचार करायचा झाला तर नाटककाराने लिहिलेली संहिता ही दृक् -श्राव्य स्वरूपात प्रेक्षकांसमोर सादर होत असते म्हणूनच नाटककार नाटक आणि नाटकाची संहिता हे अत्यंत महत्त्वाचे घटक ठरतात.यातील एका एका घटकाचा पुढील प्रमाणे विचार करता येईल.

**नाटक:**

भरत मुनींनी 'नाट्यशास्त्र' या आपल्या पुस्तकात 64 कला सांगितलेल्या आहेत. त्यांच्या मते नाटक हे संवाद , अभिनय , संगीत , आणि रस या घटकांपासून निर्मित झाले आहे. नाटकाला 'पंचमवेद' असे सुद्धा म्हटले जाते.एखाद्या गोष्टीचा , वस्तूचा , व्यक्तीचा किंवा प्राण्याचा आभास साअभीनय सादर करणे म्हणजे नाटक होय. नाटकात प्रामुख्याने संहिता,रस,भाव,संगीत, पार्श्वसंगीत,नृत्य,वेशभूष, नेपथ्य,रंगभूषा, प्रकाश योजना आणि अभिनय इत्यादींचा समावेश असतो. थोडक्यात नाटक ही रस निर्मिती आणि सौंदर्य निर्मिती यांच्या माध्यमातून लोकांपर्यंत रसास्वाद आणि अनुभूती पोहोचवणारी कला होय. नाटकाची भरतमुनी , अभिनव गुप्त ,कालिदास , अरीस्टॉटल , प्लेटो यांनी केलेल्या व्याख्या या पार्श्वभूमीवर लक्षात घेण्यासारख्या आहेत.

भरतमुनी: " नाटक म्हणजे मानवी जीवनातील वेगवेगळ्या भावनांचे अनुकरणात्मक चित्रण आहे. यामध्ये सुख- दुःख, अनुभव, कल्पना, समस्या, शंका, मनोविकार इत्यादींचा अंतर्भाव असतो."

*© 2024, SK Publisher All Rights Reserved*

**अभिनव गुप्त :**

"नाट्य म्हणजे नटाच्या अभिनयातून प्रकट होणारा व प्रेक्षकांकडून विशाल मनाने अखंड स्वरूपात गहाण केला जाणारा संपूर्ण प्रयोगातून द्योतीत होणारा असा एकात्म धर्म होय."

**कालिदास:**

"भिन्न भिन्न रुची असणाऱ्या लोकांचे एकाच वेळी समाधान करणारा नाटक हा एक वाङ्मय प्रकार आहे."

**ॲरिस्टॉटल:**

" नाटकी व्यक्तीची अनुकृती नसून एका कर्माची व जीवनाची अनुकृती असते."

प्लेटो:" नाटक हे वास्तवाची अनुकृती असते."

**नाटकाचे प्रकार:**

नाटकांचे सुखांतिका (कॉमेडी), शोकांतिका( ट्रॅजेडी), प्रहसन (फार्स )अतिनाट्य (मेलो ड्रामा) असे प्रकार पडतात. तर आशय आणि विषानुसार विचार केला तर पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय,दलित, अभिजात, भयनाट्य, कौटुंबिक नाट्य इत्यादी प्रकार पडतात. साहित्य प्रकारानुसार तर काव्य नाटक ,संगीत नाटक, चित्र नाट्य, असंगत नाट्य, बाहुली नाट्य (कठपुतली),शारीरिक नाटक इत्यादी प्रकार पडतात. नाटकाच्या लांबीनुसार नाट्यछटा, एकपात्री नाटक,लघु नाटक, एकांकिका, दीर्घांकिका, मूकनाट्य, माईम असे नाटकाचे प्रकार पडतात.स्थळ काळानुसार विचार केला तर रिंगण नाट्य ,पथनाट्य, महानाट्य, लोकनाट्य, विधी नाट्य, भक्ती नाट्य, समाज प्रबोधनपर नाटक, रंजन नाट्य इत्यादी अनेक प्रकार पडतात.

**संहिता:**

संहिता म्हणजे कलाकृतीचे लिखित स्वरूप. कुठल्याही साहित्य कृतीला एक कथा वस्तू असते.ती घटना आणि प्रसंगात गुंफलेली असते. या गुंफणीतून पात्रे प्रकट होतात आणि संवादाच्या माध्यमातून ती प्रेक्षकांशी मूक मानसिक संवाद साधत असतात. यातूनच नाटकाच्या रचना तयार होतात. नाटककार हा नाट्यरचिता असतो.तो ज्या समाजात राहतो त्या समाजाच्या रूढी परंपरा यांचा त्याच्यावर कळत नकळत प्रभाव पडत असतो. संहिता लिखाणावर देखील या रुढी प्रथा परंपरांचा परिणाम दिसून येतो. संहिता लिहितांना एखादे कथाबीज घेऊन त्यावर संस्कार करून त्या त्या नाटकात पात्र संवाद, संघर्ष, अंक ,भाषाशैली, घटना प्रसंग आणि कथानकाला समर्पक शेवट असा घटना प्रसंगाचा क्रम मांडून नाटककार साहित्याची रचना करत असतो. रंगमंचावर घडणाऱ्या घडामोडींची माहिती नटांसाठी ,दिग्दर्शकांसाठी लिखित स्वरूपात याच संहितेमुळे प्राप्त होत असते.फक्त नाट्यसंहितेचा विचार केला तर 'नाट्यसंहिता' म्हणजे नाटककाराने एखाद्या विषयावर लिहिलेले नाट्यलेखन किंवा हस्तलेखन होय. नाटककाराला कोणतेही नाटक हे परिणामकारक आणि उत्कृष्ट करण्यासाठी काही गोष्टींचा अभ्यास करणे आवश्यक असते. कुठलीही संहिता ही उत्कृष्ट दर्जाची तयार होण्यासाठी संहितेत शीर्षक,आशय,पात्रे,संवाद, भाषाशैली, स्थळ, काळ,कृती इत्यादी घटकांचा विचार करावा लागतो. या घटकांचा सविस्तरपणे उघडा पुढील प्रमाणे करून दाखवता येईल.

**१. शीर्षक :**

कोणत्याही संहितेचा प्रमुख घटक म्हणजे शीर्षक. शीर्षकावरून कथानकाचा अंदाज बांधता येऊ शकतो तसेच आशय आणि विषय देखील करू शकतो. शीर्षक वाचून संहिते विषयी उत्सुकता निर्माण होते.शीर्षक हे नेहमी लक्षवेधी असले पाहिजे.नाटकाच्या बाबतीत सांगायचे झाल्यास नाटकाचे शीर्षक हे नाटकाचा आशय विषय आणि कथानक यांच्याशी संबंधित असायला हवे. नाटकाचा गाभा त्यात असायला हवा.नाटकाला शीर्षक देताना ते लक्षवेधी तर असावेच शिवाय त्यात 'की वर्डचा' देखील वापर केलेला असावा.शीर्षक कमीत कमी शब्दाचे व अर्थपूर्ण असावे. शीर्षक रोचक व अर्थपूर्ण असण्यासोबत ऊर्जा निर्माण करणारे देखील असावे. उदाहरणार्थ- 'सखाराम बाईंडर' या

शीर्षकावरून हे नाटक सखाराम नावाच्या व्यक्तीच्या जीवनावर आधारित आहे असे लक्षात येते.म्हणजेच त्यातून त्या नाटकाची व्यक्ती सापेक्षता कळते.

**२. कथानक:**

केवळ संहितेत शीर्षक वेधक आणि रोचक असून चालत नाही ;तर संहिता देखील अर्थपूर्ण असायला हवी.कथानकाला संस्कृत मध्ये 'वस्तू' तर इंग्रजीत 'प्लॉट' असे म्हणतात. नाटकाची कथा आणि कथानक यात फरक आहे. कथा म्हणजे एखादी गोष्ट आणि कथानक म्हणजे कथेचा प्लॉट किंवा गोष्टीची मांडणी किंवा रचना असे म्हणता येईल. नाटकाचे कथानक हे समाजातील घडामोडी, रूढी ,परंपरा , समस्या यावरून निर्माण होत असते.नाटकातील कथानकाचे आरंभ , संघर्ष , मध्य आणि शेवट असे भाग असतात.

**३. आशय आणि विषय:**

संहिता लिखाणात आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे संहितेचा आशय आणि विषय. आशय म्हणजे 'बोध' किंवा आशय म्हणजे 'विचार' असेही म्हणता येईल.अर्थशून्य संहिता हे कमकुवत आणि निरर्थक असते. संहितेतील आशय आणि विषय हा समाजातील समस्या आणि अडचणींवर मात करणारा असला पाहिजे.बरेचदा नाटकाचे विषय हे सामाजिक ,कौटुंबिक , आणि ऐतिहासिक अशा प्रकारचे असतात. अशा विषयावर संहिता लिहितांना आशय आणि विषयाला खूप महत्त्व असते. त्यामुळे नाटकाला कृतीरूप प्राप्त होते. संहितेचा गाभा हा नेहमी वैचारिक आणि बौद्धिक असला पाहिजे. नाटक चिरकाल टिकण्यासाठी त्यातील आशय हा भावनाप्रधान आणि समाजात घडत असलेल्या अनिष्ट रूढी परंपरा अन्याय आणि घटना प्रसंगावर मात करणारा असला पाहिजे. उदाहरणार्थ - नटसम्राट , हॅम्लेट या नाटकांचे आशय आणि विषय हे चिरकाल टिकणारे आहेत. नाटकाच्या कथानकाचा आशय आणि विषय निवडतांना त्यात सत्यता आणि समाजातील वास्तवाचे चित्रण असायला हवे.

**४. संवाद**

संहिता लेखनात अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे 'संवाद'.संवाद म्हणजे शब्दाच्या माध्यमातून व्यक्त होणारी अभिव्यक्ती होय.दोन व्यक्तीच्या संभाषणातून जी शब्दरचना तयार होते त्याला संवाद म्हणतात. नाट्यसंवादाचा विचार जर आपण केला तर नाट्यप्रयोग होत असताना नाटकातील पात्र एकमेकांशी बोलतात, विचार विनिमय करतात त्याला संवाद असे म्हणतात. संवादाच्या माध्यमातून नाटकातील पात्रे अभिव्यक्त होत असतात. नाटकात गती आणि एकसूत्रता आणण्यासाठी संवाद महत्त्वाचे असतात. संवादामुळे नाटकाला गती मिळते.नाटकातील संवादाचा उद्देश फक्त बोलणे हा नसून नटाच्या मनातील गुंतागुंत, भावना, संघर्षमयता व्यक्त करणे हा देखील असतो. हे संवाद बरेचदा विधानात्मक, निवेदनात्क, प्रश्नोत्तरात्मक किंवा उद्गारवाचक इत्यादी प्रकारात मोडणारे असतात.

**५. भाषा :**

भाषा हा संहितेचा प्राण असतो.भाषेमुळे कलाकृतीतील भौगोलिक प्रदेश कळतो. भाषेवरून स्थळ ,काळ , वेळ, घटना ,प्रसंग इत्यादी गोष्टींची आकलन होते. नाटकाची भाषा हा नाटकाच्या संहितेचा महत्त्वाचा घटक आहे.समयसूचकता , सहजता , स्पष्टपणा हे गुणधर्म तिच्या अंगी असले पाहिजेत.भाषा ही व्यक्तीनुसार किंवा व्यक्तिरेखेनुसार बदलू शकते. उदाहरणार्थ शहरी भाषा ,ग्रामीण भाषा , प्रमाण भाषा इत्यादी. नाटकात भाषेचा वापर हा पात्राच्या व्यक्तिरेखेनुसार करण्यात यावा. त्याचबरोबर वापरण्यात येणाऱ्या म्हणी , वाक्प्रचार , सुविचार यांचा योग्य वापर संहितेच्या भाषेत करण्यात यावा.वास्तविक प्रकारच्या नाटकात भाषेची बंधने पाळली गेली पाहिजेत. पात्रानुसार संवादाची भाषा असायला हवी. शाब्दिक कोट्या करतांना मर्यादा पाळल्या गेल्या पाहिजेत. असंविधानिक भाषेचा वापर टाळला पाहिजे.

**६. संघर्ष:**

मानवी आयुष्य हे संघर्षाने भरलेले आहे.कुठलीही संहिता लिहितांना त्यात जर संघर्ष असेल तर तो 'पॉईंट ऑफ अटॅक' असतो. संघर्षाची गुंफण जर उत्तमरीत्या संहितेत केली असेल तर ती कलाकृती अजरामर ठरते. नाटकात असे संघर्ष हे दोन किंवा अधिक पात्रात किंवा फक्त एका पात्रातील अंतर्गत संघर्ष असे दाखवले जातात.स्वगताच्या माध्यमातून अंतर्गत संघर्ष देखील दाखवले जातात. संघर्ष हा तणावापेक्षा वेगळा असतो. बरेचदा हा संघर्ष न्याय - अन्याय सत्य - असत्य असा असतो. नाटकाची संहिता लिहितांना संघर्ष हा किती प्रभावी आणि कौशल्यपूर्ण मांडला गेला आहे यावर नाटकाचे यश अपयश अवलंबून असते.

**७. व्यक्तिरेखा / पात्रे:**

संहितेत लेखक आपल्या कल्पनाशक्तीने जी पात्रे निर्माण करतो त्याला व्यक्तिरेखा किंवा पात्रे असे म्हणतात. संहिता लिहितांना आयुष्यात येणाऱ्या व्यक्ती , बघितलेल्या व्यक्ती , वाचलेल्या व्यक्ती , कल्पनेतून साकारलेल्या व्यक्ती , इत्यादी व्यक्तिरेखा लेखक साकारत असतो. व्यक्तिरेखा या संहिता लेखक आणि प्रेक्षक यांच्यामधील दुवे असतात. नाटकाची संहिता लिहितांना नाटककार जी पात्रे उभी करतो त्यासाठी त्याला अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. पात्र शारीरिक दृष्ट्या कसे दिसेल ? सामाजिक दृष्ट्या ते कसे आहे ? त्याची धार्मिक ,राजकीय , सामाजिक ,आर्थिक स्थिती काय आहे ? पात्र सामान्य आहे की असामान्य ? त्याचा जीवन विषयक दृष्टिकोन कसा आहे ? त्याच्या सवयी ,आवडी - निवडी , इच्छा ,महत्त्वाकांक्षा काय आहेत ? त्याचे नैतिकदृष्ट्या विचार कसे आहेत ? या आणि अशा अनेक गोष्टींचा विचार करून पात्रांची रचना नाटककाराने संहितेत करणे अपेक्षित असते.

**नाटकाची संहिता लिहिताना नाटककाराने काय काळजी घ्यावी:**

१. संहितेतील व्यक्तिरेखांची पार्श्वभूमी प्रथम निश्चित करावी. नाटकातील पात्रे ,त्यांची भाषा , नाटकाचा काळ इत्यादी गोष्टी नाटककाराने ठरवाव्यात.

२. कथानकाची सुसंगत गुंफण करावी.नाटकाची सुरुवात तसेच शेवट ठरवून घ्यावा. दृश्य सुसंगतपणे उभे करावेत. कथानकाचा सार बदलणार नाही याची काळजी घ्यावी. कथानक भरकटणार नाही याची देखील जाणीव ठेवावी.

३. कलाकाराचे शब्द , हालचाली , यांचाही संहिता लेखकाने विचार केला पाहिजे.

४. कथानकात रहस्यमयता असेल तर प्रेक्षकांची उत्सुकता आणि रहस्यमयता ताणून धरणारे संवाद व दृश्य नाटककाराने उभे केले पाहिजेत.अशा प्रकारच्या संहितेत प्रेक्षक नेहमी गुंतून जात असतो.

५. संहितेत पात्रांचा एकमेकांशी असलेला संघर्ष नाटकाची रंगत वाढवण्यासाठी नेमकेपणाने नाटककाराने उभा केला पाहिजे.

६. संहितेतील विरोधाभास सूक्ष्म आणि अत्याधुनिक मार्गाने नाटककाराने तयार केला पाहिजेत.

७.नाटकांची संहिता लिहितांना कंसामध्ये स्थळ,काळ,वेळ , आणि परिस्थिती व पात्रांची माहिती थोडक्यात नाटककाराने स्पष्ट केली पाहिजे.

८. नाट्यमयता आणण्यासाठी प्रतिकात्मक मूल्यांचा आणि शब्दांचा देखील नाटककाराने वापर केला पाहिजे.

अशा प्रकारे नाटककाराने नाटकाची संहिता लिहितांना जर काळजी घेतली तर ती संहिता उच्च प्रतीची उच्च दर्जाची ठरेल आणि अशा उच्च दर्जाच्या संहितेवर आधारित नाटकांचे प्रयोग हे यशस्वी होतील यात शंका नाही .

:::. Cite this article .:::

काकडे, प्रा. डॉ. श्रीकृष्ण गो. & पाकदुने, निलेश उद्धवराव. (2024). नाटक, नाटककार आणि संहिता लेखन. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 251–255.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.50